# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.04.2025** **वार-शनिवार**

---

**सदोष बस**

पुणे महानगर परिवहन महामंडळ अर्थात पीएमपीएमएलच्या ताफ्यात महिन्याभरापूर्वी दाखल झालेल्या 123 नव्या सीएनजी बस सदोष असल्याने त्यांची सेवा बंद करण्यात आली आहे अशी माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे. या सर्व बस संबंधित कंपनीकडे परत पाठविण्यात आल्या असून, बसमधील तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतरच त्या मार्गांवर सोडण्याचा निर्णय पीएमपी प्रशासनाने घेतला आहे. पीएमपीनं आयुर्मान संपलेल्या बस मोडीत काढत नव्यानं आधुनिक बस घेण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार 123 सीएनजी बस घेण्यात आल्या आहेत.

**मालमत्ता कर सवलत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं आर्थिक वर्ष 2025-26 करिता नेहमीप्रमाणे मालमत्ता कर सवलतीच्या विविध योजना जाहीर केल्या आहेत. आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर येत्या 30 जून पर्यंत ऑनलाईन पद्धतीनं भरला तर 10 टक्के सवलत मिळणार आहे. महानगरपालिका हद्दीत महिलांच्या नावावर असलेल्या निवासी मालमत्तेवर सामान्य करात 30 टक्के, दिव्यांगांना 50 टक्के आणि माजी सैनिकांना मालमत्ता करात 100 टक्के सवलत देण्यात येणार आहे. या सवलतींचा लाभ येत्या 30 जून पर्यंत घेता येणार आहे. या सवलतीचा लाभ घेऊन आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये पहिल्या तिमाहीमध्ये 3 लाख 49 हजार 838 मालमत्ताधारकांनी 435 कोटी मालमत्ता कर वेळेत भरला आहे.

**उद्योग सुविधा मदत केंद्र**

राज्य सरकारच्या '100 दिवसांचा कृती आराखडा' उपक्रमांतर्गत 'गुंतवणूक प्रसार कृती कार्यक्रमा'चा एक भाग म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं उद्योग सुविधा कक्षाचं मदत केंद्र, भोसरी येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड अँग्रीकल्चर कार्यालयातून लवकरच कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. उद्योग क्षेत्राला कौशल्य विकास केंद्रामार्फत कुशल मनुष्यबळ पुरविण्यास मदत, कामगारांना सामाजिक सुविधा मिळण्यासाठी सहकार्य तसंच सामाजिक उत्तरदायित्व माध्यमातून

उद्योगांना शहराच्या विकासासाठी प्रकल्प सुचविणे अशा अनेक सेवा या कक्षामार्फत देण्यात येणार आहेत.

**फुले स्मारक भूसंपादन**

महात्मा फुले राष्ट्रीय स्मारकासाठी आवश्यक असलेल्या जागा ताब्यात घेताना संबंधित जागामालक तसंच तिथल्या भाडेकरूंना नुकसानभरपाई कशी द्यायची, यासाठी इथल्या जागाबाधितांचं सर्वेक्षण पुन्हा करण्याचा निर्णय पुणे महापालिकेनं घेतला आहे. या भागातील जागामालक, भाडेकरूंच्या घरी जाऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांना कोणत्या प्रकारचा मोबदला अपेक्षित आहे, याची माहिती गोळा करून अहवाल तयार केला जाणार आहे अशी माहिती महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी दिली. जागा ताब्यात घेताना भूसंपादनाची सक्ती न करता, जागामालकांना आवश्यक तो मोबदला देऊन या जागा ताब्यात कशा मिळतील, यासाठी महापालिका प्रशासनाचा प्रयत्न राहणार असल्याचं आयुक्तांनी स्पष्ट केलं.

**रक्तपेढ्यांवर कारवाई**

पुणे विभागात 205 रक्तपेढ्या आहेत. अन्न आणि औषध प्रशासनाच्या पथकानं केलेल्या रक्तपेढ्याच्या तपासणीत 3 रक्तपेढ्यांचे परवाने रद्द करण्यात आले, तर 48 रक्तपेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले. रक्त घेण्यासाठी पात्र व्यक्ती नसणे, रक्त तपासणीची सुविधा नसणे, परराज्यात परवानगीविना रक्त पाठविणे,रक्तदान शिबिरावेळी दात्यांना भेटवस्तू देणे, अशा प्रकारच्या नियमांचं उल्लंघन या रक्तपेढ्यांनी केले होतं असं पुणे अन्न आणि औषध प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.

**बीजसंमेलन**

सह्याद्री देवराई आणि भारती विद्यापीठ पुणे यांच्यावतीनं 25 आणि 26 एप्रिल रोजी महाराष्ट्रातील पहिले दोन दिवसीय बीज संमेलन होणार आहे. हे संमेलन भारती विद्यापीठाच्या पुणे- सातारा रोड इथल्या धनकवडी शैक्षणिक संकुलाच्या प्रांगणात होणार आहे.

**औद्योगिक भेट**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स च्या एमबीए आणि एमसीए विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट नुकतीच आयोजित करण्यात आली होती. प्रत्यक्ष औद्योगिक आस्थापनांमध्ये कशा प्रकारे कामकाज चालतं तसंच औद्योगिक व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन आदी क्रमिक अभ्यासक्रमातील बाबी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहता आल्या, त्यांच्यातील परस्पर समन्वय, पायभूत सुविधा, वेष्टण उत्पादन प्रक्रिया विभाग आदी विविध बाबींचं कामकाज विद्यार्थ्यांना जवळून पाहता आलं.

**अग्निशमन उपक्रम**

राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताहानिमित अग्निशमन विभागातर्फे विविध उपक्रम  राबविण्यात येत आहेत. यानिमित्त साईनाथ मंडळ ट्रस्टतर्फे बाजीराव रस्त्या-वरील नूतन मराठी विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयामधील 300 विद्यार्थ्यांना आज आग विझविण्याचं प्रशिक्षण देण्यात आलं. आग कशामुळे लागू शकते, आपत्कालिन परिस्थिती उद्भवल्यास काय-काय उपाययोजना कराव्यात या विषयी कसबा अग्निशमन केंद्रातील प्रभारी अधिकारी कमलेश  चौधरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 अंश तर किमान तापमान 22 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**